**पुणे विद्यापीठ**
**गणेशखिंड, पुणे-४११००७.**

**परीक्षा विभाग**

**दूरध्वनी क्र.०२० - २५६०१२०४**
**इंजि. - २५६०१२१९**
**मॅनेज/लॉ/शि.शा.- २५६०१२१६**
**आर्टस - २५६०१२१३**
**सायन्स-२५६०१२१४/कॉमर्स-२५६०१२१५**
**फार्मसी/मेडिकल - २५६०१२२०**

**टेलिग्राफ : "युनिपुणे"**
**फॅक्स - ०२० -२५६०१२०४**
**फॅक्स - ०२० - २५६०१२०८**
**वेबसाईट:www.unipune.ernet.in**
**वेबसाईट:www.unipune.ac.in**
**ई-मेल : coe@unipune.ernet.in**

---

संदर्भ : परीक्षा/ BSc/ 908 दि.२६.३.२०१० 27

मा.प्राचार्य/मा. संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.

विषय : विद्यापीठाच्या विविध परीक्षांच्या केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाबाबत

महोदय/महोदया,

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३२ [ ५] [एफ] अन्वये विद्यापीठांच्या सर्व परीक्षांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन, केंद्रीय मूल्यमापन प्रध्दतीने करण्याची तरतूद असून कलम ७२ अन्वये परीक्षांचे निकाल ३० दिवसांच्या आत व जास्तीत जास्त ४५ दिवसापर्यंत लावावयाचे असतात.

विविध परीक्षांचे केंद्रिय मूल्यमापन प्रकल्प विविध महाविद्यालय/संस्था येथे आयोजित करण्यात येत आहेत/असतात. केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पासाठी महाविद्यालयातील/संस्थेतील विविध शिक्षकांच्या नियुक्त्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन व नियमन करण्यासाठी करण्यात येत असतात. या संदर्भात आपणास विनंती की, केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पांतर्गत केले जाणारे मूल्यमापनाचे काम वेळेत व सुरळीत पार पाडण्यासाठी विद्यापीठाने नियुक्त केलेल्या आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांना केंद्रिय मूल्यमापन प्रकल्पाच्या ठिकाणी वेळेवर उपस्थित राहण्यास सांगावे. केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाच्या ठिकाणी जाताना, संबंधित परीक्षकांकडे महाविद्यालयाचे संमतिपत्र [Releaving Order] व त्यामध्ये शिकवत असलेला विषय, अनुभव याचा उल्लेख असावा तसेच त्यांच्याजवळ ओळखपत्र असावे, याची माहिती संबंधित परीक्षक/नियामक यांना द्यावी, ही विनंती.

परीक्षेंच्या आयोजनामध्ये आपले नेहमीच सहकार्य लाभलेले आहे .व ते येथून पुढे सुध्दा मिळेल अशी खात्री आहे.

कळावे,

आपला विश्वासू,
(signature)
प्र.परीक्षा नियंत्रक